# दुचाकी घसरून झालेल्या अपघातातील जखमीचा मृत्यू

**सातारा : प्रतिनिधी**

रस्त्यावर झालेल्या अपघातातील जखमीचा मृत्यू झाल्याची नोंद फलटण शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २७ जानेवारी रोजी जाधववाडी हद्दीतील जुन्या सरकारी दवाखान्याजवळ मोटरसायकल स्लिप होऊन घसरून सचिन संपत यादव वय ४५ रा. गिरवी, ता. फलटण यांचा अपघात झाला होता. त्यांच्यावर केईएम हॉस्पिटल, पुणे येथे उपचार सुरू होते. परंतु त्यांच्या डोक्याला मुका मार लागल्याने व मेंदूत रक्तस्राव झाल्याने डॉक्टरांनी त्यांना घरी घेऊन जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे शहाजी संपत यादव यांनी त्यांना फलटणमधील एका हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले होते. तेथे औषध उपचार सुरू असताना त्यांचा दिनांक २ फेब्रुवारी रोजी मृत्यू झाला. याबाबतची फिर्याद फलटण शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली असून अधिक तपास पोलीस हवालदार वीरकर करीत आहेत.

# श्री श्री रविशंकर यांच्या हस्ते कोटी लिंगार्चन कार्यक्रमाचा शुभारंभ संपन्न

**वडूज : प्रतिनिधी**

तीर्थक्षेत्र फाउंडेशनच्या आयोजनातुन देशभरात प्रथमच घडणाऱ्या कोटीलिंगार्चन या कार्यक्रमाचा लिंगार्चन व धर्मध्वजारोहण सोहळा शिखर शिंगणापूर येथे शुभारंभ वैश्विक आध्यात्मिक गुरु व आर्ट ऑफ लिविंग चे प्रणेते श्रीश्री रविशंकर यांच्या हस्ते श्रीक्षेत्र शिखर शिंगणापूर येथे करण्यात आला.

यावेळी माजी मंत्री आमदार महादेव जानकर, माण खटाव आमदार जयकुमार गोरे, आ रामहरी रुपनवर, माजी आयुक्त प्रभाकर देशमुख,प पू सुंदरगिरी महाराज आदींची प्रमुख उपस्थिती होती.विश्वगुरु श्री श्री गुरुजी यांनी महाराष्ट्राचं कुलदैवत श्री शंभु महादेवाचे दर्शन घेऊन देवास अभिषेक घालून पुढील कार्यक्रमास सुरुवात केली. या कार्यक्रमाच्या वेळेस सूत्रसंचालन अक्षय महाराज भोसले यांनी केले. या कार्यक्रमाच्या वेळी दहिवडी व म्हसवड पोलीस स्टेशनने बंदोबस्त व्यवस्थित केला होता.

कोटीलिंगार्चन हा मुख्य सोहळा महाशिवरात्री पर्वकाळात दि.१६ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२३ रोजी असून यादरम्यान रोज लक्ष भोजन देखील आयोजित करण्यात आले आहे.

विश्व कल्याणासाठी व विश्वातील शांततेसाठी श्रीश्रींचे कार्य अमूल्य आहे.महाशिवरात्रीच्या पर्व काळामध्ये शिखर शिंगणापूर येथे कोटिलिंगार्चन कार्यक्रम संपन्न होतोय. महा एनजीओ फेडरेशनचे संस्थापक शेखर मुंदडा हे या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष असून मोहन बडवे हे अध्यक्ष आहेत. यावेळी मोठ्या प्रमाणात सत्संगचे व श्रीश्रींच्या ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले आहे. तीर्थक्षेत्र फाउंडेशनच्या माध्यमातून महाराष्ट्रभरातील प्रत्येक जिल्ह्यातून हजारो भाविक या सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत.

शिखर शिंगणापूर येथे विश्वगुरु श्री श्री गुरुजी यांनी महाराष्ट्राचं कुलदैवत श्री शंभु महादेवाचे दर्शन घेऊन देवास अभिषेक घातला.

# बाणेर, बालेवाडी येथे भरवस्तीत सिमेंट व खडी प्लॉंट उभारल्याने नागरिकांना होतोय धुळीचा प्रचंड त्रास

## प्रशासनाने याची तात्काळ दखल घेऊन कार्यवाही करण्याची रहिवाशांची मागणी

**बाणेर : रमेश जयस्वाल**

बाणेर, बालेवाडी अनेक घरे डोंगरी कुशीत वसलेली आहेत. या विभागात घरे सर्व सोयी आणि सुविधांयुक्त हाकेच्या अंतरावर असल्यामुळे आरामदायी जीवन जगता यावे म्हणून अनेकांनी या विभागात घरे विकत घेतली; परंतु या विभागात कन्स्ट्रक्शनची अनेक कामे सुरू आहेत. पाया खोदतांना ब्लास्टिंगचा वापर आणि मशीनव्दारे खडक फोडण्याच्या प्रकारामुळे रोज सकाळ ते रात्री अपरात्रीपर्यंत मोठा आवाज येत आहे. यात भर पडली ती या परिसरात सुप्रीम सोसायटी बाणेरमागे सिमेंटचा प्लॅंट आणि दगडापासून बारीक चुरा करण्याचा प्लॅंट भर नागरीवस्तीत उभारल्यामुळे उडणारा धुराचा थेट घरावर आणि पार्किंग मधील उभ्या गाड्यांवर मातीचा, सिमेंटचा थर साचत आहे. यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. याची तत्काळ

दखल घेऊन प्रशासनाने कार्यवाही करावी, अशी परिसरातील रहिवाशांची मागणी आहे.

बाणेरमध्ये आरएमसी प्लॉंट उभा करण्यात आला आहे. या प्लॉंटमधून धुळीचे लोट उडत आहेत. त्याचप्रमाणे या विभागात अनेक बांधकामे सुरू आहेत. सिमेंट, खडी, माती, दगड वाहतूक करण्यासाठी मोठ्या आकाराच्या वाहनांची सतत वर्दळ असते. या वाहनांतून रोडवर माती, दगड, बारीक चुरा रोज रोडवर पडत आहे. रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांमुळे रस्त्यावर पडलेली माती रोज उडत आहे. त्यामुळे येथील रहिवाशी आणि जाण्या-येणाऱ्या नागरिकांना या धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. प्लॉंट उभारताना रहिवाशी भागाचा पालिका बांधकाम विभाग तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाने या विभागातील रहिवाशांचा विचार करणे आवश्यक होता.

सिमेंट प्लॉंट भर वस्तीत उभारण्याची कोणी परवानगी दिली, याची सखोल चौकशी करण्याची मागणी या विभागातील जनतेने केली आहे. तसेच बांधकाम व्यवसायिकांकडून नियमांची पायामल्ली होत आहे. येथून वाहतूक करणाऱ्या वाहनांतून भर रोडवर पडणारी माती, चुरा दगडांमुळे रस्त्यावरून जाणाऱ्या इतर वाहनांना आणि जनतेला त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावरील माती ही या वाहनांमुळे उडत आहे. यामुळे प्रदूषणात वाढ होत आहे.

बांधकाम विभागाचे अभियंता आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांनी संबंधित सिमेंट प्लॉंटची आणि नियमांची पायामल्ली करणारे बांधकाम व्यावसायिकांच्या जागेची तत्काळ पाहणी करून कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# कोल्हापूर जिल्हा बँकेची ईडीकडून ३० तास चौकशी

## बँकेतील कर्मचाऱ्याला हृदयविकाराचा झटका

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ईडीच्या पथकाने कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची सलग तीस तास चौकशी केल्याने बँकेतील कर्मचारी सुनील लाड यांना हृदयविकाराचा झटका आला आहे. त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ईडीकडून ३० तास चौकशी सुरू असताना लाड बँकेत कार्यरत होते. दरम्यान, ईडीच्या पथकाने तब्बल ३० तास छप्पेमारी करत बँकेच्या पाच अधिकाऱ्यांना ताब्यात घेतल्यानंतर जिल्हा बँकेतील कर्मचारी चांगलेच आक्रमक झाले आहेत. आज सकाळी कर्मचाऱ्यांनी एक तास काम बंद आंदोलन करून निषेध केला होता.

दरम्यान, गुरुवारी सायंकाळी कोल्हापुरात मुख्य बँक शाखेच्या प्रांगणात कर्मचाऱ्यांनी एकत्रित जमताना जोरदार घोषणाबाजी केली होती. ईडीकडून समन्स बजावण्यात आलं असलं, तरी शुक्रवारी हजर करु अशी विनंती कर्मचाऱ्यांनी केली होती. मात्र, ती फेटाळण्यात आल्याने कर्मचारी आक्रमक झाले होते. निषेधाच्या घोषणा कर्मचाऱ्यांनी दिल्याने काही काळ वातावरण तणावपूर्ण झाले होते.

३० तासांपासून बँकेमध्ये कारवाई सुरुच असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये चांगलीच अस्वस्थता होती. गुरुवारी सकाळपासून आपापले विभाग सोडायचे नाहीत असे आदेश देण्यात आले होते. चारच्या सुमारास सर्व कर्मचाऱ्यांना बँकेतून खाली पाठवल्याने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह पाच अधिकाऱ्यांना ताब्यात घेतल्याचे समजताच कर्मचारी आक्रमक झाले होते. ३० तास चौकशी केल्याने अधिकारी तणावाखाली आहेत, त्यामुळे त्यांच्या प्रकृतीला काही झाल्यास सर्वस्वी ईडी जबाबदार असेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला होता. ३० तास चौकशी केल्याने कर्मचाऱ्यांच्या डोळ्यावर त्याचे परिणाम स्पष्ट दिसत होते.

### पाच अधिकारी ईडीच्या ताब्यात

**दरम्यान, गुरुवारी (२ फेब्रुवारी) सुद्धा ईडीची कारवाई सुरु राहिली. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ए. बी. माने यांच्यासह मुख्यालयातील पाच अधिकाऱ्यांना ईडीच्या पथकाने गुरुवारी सायंकाळी ताब्यात घेतले. त्यांना पोलीस बंदोबस्तात मुंबईला नेण्यात आलं आहे. ईडीने तब्बल ३० तास ब्रिक्स व संताजी घोरपडे साखर कारखान्याची संबंधित सर्व व्यवहारांची कसून चौकशी केली. गुरुवारी सायंकाळी मुख्य कार्यकारी अधिकारी माने, पत देखरेख विभागाचे व्यवस्थापक आर. जे. पाटील, सहाय्यक व्यवस्थापक अल्ताफ मुजावर, निरीक्षक सचिन डोणकर आणि राजू खाडे यांना समाज बजावून ईडीच्या पथकाने ताब्यात घेतले आहे.**

# गिरझणी-अकलूज येथे विधवा महिलांसाठी हळदीकुंकू

गिरझणी येथे विधवा महिलांचा संक्रातीचे वाण देऊन सन्मान करण्यात आला.

**अकलूज : प्रतिनिधी**

विधवा महिलांना सुवासिनींचा मान मिळावा, स्त्री म्हणून सन्मानाने जगता यावे यासाठी गिरझणी (अकलूज) येथे मकरसंक्रांतीचे औचित्य साधून समाजातील विधवा महिलांसाठी हळदी-कुंकवाच्या कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी विधवा महिलांना हळदी-कुंकू लावून संक्रातीचा वाण देण्यात आला. तसेच विधवा महिलांच्या हस्ते केक कापून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन अनिता महादेव माने यांनी केले. या कार्यक्रमासाठी त्यांना पती महादेव माने यांचे सहकार्य लाभले. विधवा स्त्रीलाही जगण्याचा हक्क आहे, समाजाने त्यांना मानसन्मान देऊन मानसिक आधार देण्याची गरज आहे. अशा कार्यक्रमांमुळे विधवा महिलांना आत्मसन्मान प्राप्त होत आहे व समाजाची मानसिकताही बदलत आहे. आता प्रत्येक वर्षी आम्ही हा कार्यक्रम घेणार असल्याचे अनिता माने यांनी नमूद केले. दरम्यान, या कार्यक्रमाचे समाजातून कौतुक होत आहे.

# गावाने एकत्र येऊन विकासासाठी झटले पाहिजे : पोपटराव पवार

**शाहूवाडी तालुक्याच्या या निसर्गाच्या कुशीत वसलेल्या ऐनवाडी धनगरवाडी गावातील वातावरण पाहून मन भरवले आहे . इथं पडणाऱ्या पावसात भिजायला आणि चिखलातून चालायला मला नक्की आवडेल आणि यासाठी मी जुलै महिन्यात पुन्हा एकदा येणार असल्याचे मत व्यक्त करताच नागरिकांच्या मनालाही एक सुखद धक्का बसला .तिथल्या वातावरणात आपण भारावून गेलो असल्याचे पोपटराव पवार म्हणाले.**

**शाहूवाडी : प्रतिनिधी**

पैशाने गाव बदलत नाही तर गाव एकत्र येऊनच गावचा विकास होतो .यासाठी गावाने एकत्र येऊन विकासासाठी झटले पाहीजे आदर्श गाव संकल्प प्रकल्प समितीचे कार्याध्यक्ष हिवरे बाजारचे आदर्श सरपंच पोपटराव पवार यांनी ऐनवाडी धनगरवाडी येथे आयोजित विशेष ग्रामसभे प्रसंगी केले .

शाहूवाडी तालुक्यातील ऐनवाडी धनगरवाडी या ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने आदर्श गाव संकल्पनेबाबतच्या आयोजित विशेष ग्रामसभेत उपस्थित नागरीकांना मार्गदर्शन प्रसंगी ते बोलत होते .यावेळी प्रांत अधिकारी अमित माळी ' कृषी उपसंचालक सुरेश भालेराव ,तहसीलदार गुरु बिराजदार,गटविकास अधिकारी रामदास बगे उपसरपंच सुरेश लांबोरे,तंत्र अधिकारी सुरेश शिंदे तालुका कृषी अधिकारी अभिजीत धेडे यांची प्रमुख उपस्थिती होती .पुढे बोलताना पोपटराव

पवार म्हणाले की लोक सहभाग हा फार महत्त्वाचा आहे .योजना सक्षमपणे कशा राबवता येतील हे महत्त्वाचे आहे .श्रमदानाची तयारी आणि सात सुत्रांची अंमलबजावणी केल्यास आपण नक्कीच यशस्वी होऊ शकतो.

ग्रामस्तरावरील अधिकारी कर्मचारी यांचे देखील गावच्या विकासात महत्त्वाचं योगदान आहे. गावचा विकास हाच सर्वांचा हेतू असतो .या परिसरातील वातावरण आणि नैसर्गिक अनमोल ठेवा हा बहुमोल आहे .यापुढे आदर्श गावाबरोबरच आरोग्य दृष्ट्या सक्षम गाव बनवण्यासाठी देखील विशेष लक्ष राहणार आहे ..गावच्या विकासासाठी आराखडा तात्काळ सादर करा लगेच निधी देणार असल्याचे आश्वासन ही त्यांनी यावेळी दिल्याने ग्रामस्थांच्यात उत्साह संचारला.

दरम्यान, पोपटराव पवार यांनी ग्रामस्थ संबंधित 'विभागाचे अधिकारी 'कर्मचारी 'युवक 'युवती नागरिक यांच्याशी संवाद साधून आदर्श गाव बनवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विकासात्मक बाबी यासाठी सुसंवाद साधला .व आवश्यक करावयाच्या बाबी आत्मसात करून घेतल्या .

यावेळी आंबवडे चे आदर्श सरपंच धनाजी गुरव यांनी देखील आदर्श गाव संकल्पनेबाबत आपले अनमोल मार्गदर्शन केले. प्रारंभी उपस्थित सर्व मान्यवरांना केंद्रीय प्राथमिक शाळा माणच्या झांज पथकाने स्वागत करण्यात आले ग्रामसेवक जालिंदर भोसले यांनी प्रास्ताविक पर मनोगतात ग्रुप ग्रामपंचायत धनगरवाडीचा आढावा घेतला याप्रसंगी या कार्यक्रमास तंत्र सहाय्यक चंद्रकांत गोरे कौन्सिल ऑफ अग्रिकल्चर रूरल डेव्हलपमेंट चे अध्यक्ष सुधीर पाटील 'बालविकास प्रकल्प अधिकारी स्नेहल माने , टसर रेशीम मास्टर मोरेश्वर कुसरे गटशिक्षणाधिकारी सौ. जयश्री जाधव, केंद्रप्रमुख कैलास वसावे, महादेव ठाणगे,मंडल कृषी अधिकारी नितीन रणदिवे 'शिवाजी काशीद, कृषी सहाय्यक श्री.वळवी ग्रामसेवक जालिंदर भोसले सुभाष भोसले राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक संजय जगताप, संभाजी लोहार, बाबुराव शिंदे ,सुधाकर चव्हाण किरण सुतार यांच्यासह ऐनवाडी धनगरवाडी गावातील महिला पुरुष युवक युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घनकचरा व्यवस्थापनासाठी ठेकेदाराने नेमला उपठेकेदार

## कामाच्या दर्जावर परिणाम शक्य प्रशासकांनी लक्ष घालण्याची तातडीची गरज

**सातारा : प्रतिनिधी**

सोनगाव कचरा डेपोच्या कामासंदर्भात 'चुका करा आणि त्यातून शिका' ही प्रणाली सातारा पालिकेने पुढे सुरू ठेवली आहे. घनकचरा व्यवस्थापनाच्या ठेक्यांमध्ये संबंधित नियुक्त ठेकेदाराने या कामासाठी उपठेकेदार नेमल्याचे समोर आले आहे. दुसरी संस्था परस्पर कशी नेमण्यात आली. याला जाब विचारणारे लोकनियुक्त नगरसेवक नसल्यामुळे या कामाचा खोळंबा झाला आहे.

पालिका प्रशासनाने या परस्पर हस्तांतरणाला मूक संमती दर्शवल्याचे स्पष्ट होत असून प्रशासक अभिजीत बापट यांच्या राज्यात चाललय काय हाही प्रश्न निर्माण झाला आहे शहर आणि विस्तारित भागातील कचऱ्याचे संकलन केल्यानंतर त्यावर सोनगाव डेपोत प्रक्रिया होते यासाठी पालिका प्रशासनाने येथील कामे ठेकेदारी तत्त्वावर काहीजणांना दिली होती अशाच पद्धतीने घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प चालवण्याचे काम पालिकेने परराज्यातील एका ठेकेदाराला दिले होते कामातील अनियमितता राजकीय प्रशासकीय हस्तक्षेप आणि इतर कारणांमुळे या कामांमध्ये अडचणी निर्माण होत होत्या वारंवारच्या या कटकटीला कंटाळून परराज्यातील त्या ठेकेदाराने पाच वर्षासाठी दिलेला ठेकां मध्येच सोडला हे करण्यापूर्वी पालिकेने त्या ठेकेदाराला नोटीस बजावत बिल कपातीची कारवाई केली पालिका प्रशासनाची वारंवार होणार संघर्ष टाळण्यासाठी त्या ठेकेदाराने हे काम थांबवणे पसंत केले डेपोतील हे काम बंद असल्याने त्या ठिकाणी कचरा ढीग साचण्यास सुरुवात झाली त्यामुळे पालिका प्रशासनाने मध्यंतरीच्या काळात सुवर्ण मध्य काढत पुणे येथील एका ठेकेदाराला घनकचरा व्यवस्थापनाचे काम दिले या कामाच्या अनुषंगाने वारंवार ओरड होऊ लागल्याने पालिका प्रशासनाने कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा हा प्रयत्न केला या हालचालीसाठी देखील मध्यम मार्ग अवलंबण्यात आल्याची समोर येत आहे.

कामाचा ठेका घेतलेल्या पहिल्या ठेकेदारास काळ्या यादीत न टाकता त्याच्यावर कोणती ठोस कारवाई न करता त्याच्या संमतीने सोनगाव कचरा डेपोतील घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी दुसरी संस्था व ठेकेदार नेमण्याचा निर्णय झाला या निर्णयावर पालिकेने नुकतेच शिक्कामोर्तब केले या परस्पर हस्तांतरणाविषयी विलक्षण आश्चर्य व्यक्त होत आहे पालिकेच्या सर्वच विभागात ठेकेदारांची मोठी साखळी आहे प्रशासकीय राजकीय वरदहस्तावर विविध कामे घेऊन नंतर ती टक्केवारी देऊन इतरांना विकण्याचे सुद्धा मोठे रॅकेट पालिकेत कार्यरत आहे या ठेकेदारांमुळे व त्यांच्या कार्यपद्धतीमुळे शहरातील विविध विकास कामांच्या दर्जाचा प्रश्न निर्माण होताना दिसतो कचरा डेपोतील काम आणि त्यांचे ठेके यापूर्वी वारंवार चर्चे त होते मात्र सध्या कार्यकारणी नसल्यामुळे प्रशासन सुसाट असून त्यांनी ठेकेदारा आणि नेमलेल्या संस्थेची मनोमिलन करत ठेक्याचे हस्तांतरण केले आहे भविष्यामध्ये हा पायंडा पालिका प्रशासनासाठी अडचणीचा ठरू शकतो.

### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी दुचाकी चालकावर गुन्हा

**सातारा :** मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी दुचाकी चालकावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास सोमनाथ बाळकृष्ण पोतदार रा. धामणेर स्टेशन, ता. कोरेगाव हा त्याची दुचाकी क्रमांक एमएच ११ डीसी ४१८३ वरून निघाला असता विशाल बिभीषण धुमाळ रा. कळंबी, पुसेसावळी, ता. खटाव याने त्याच्या ताब्यातील पल्सर मोटरसायकल क्रमांक एमएच ११ बीजी ९२७७ ही भरधाव वेगाने, बेदरकारपणे चालवीत रॉंग साईडने सोमनाथ यांच्या गाडीस धडकवली. या अपघातात सोमनाथ पोतदार हे गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

# मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

अपघातात मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक ५ जानेवारी रोजी साडेबारा वाजण्याच्या सुमारास मोहन देवजी पटेल रा. कृष्णा हाऊसिंग सोसायटी, करंजे पेठ, सातारा हा अशोक हनुमंत राजे भोसले राहणार विसावा नाका सातारा हे त्यांच्या स्कुटी क्र. एम एच ११ डीएफ ९६१४ या वाहनावरून कोरेगाव रस्त्याकडे जात असताना संगम माहुली कृष्णा नदीच्या पुलाच्या अलीकडे समोर चाललेल्या उसाच्या ट्रॅक्टरला ओव्हरटेक करत असताना मोहन पटेल याने स्कुटी चा अचानक ब्रेक मारल्याने आणि सुरक्षित अंतर न ठेवल्यामुळे तोल जाऊन स्कुटी पडल्याने मागे बसलेला अशोक हनुमंत राजेभोसले हा बाजूने चाललेल्या उसाच्या दोन नंबरच्या ट्रॉलीच्या चाकाखाली पडला.

या अपघातात अशोक राजेभोसले यांचा मृत्यू झाला. त्यामुळे त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी मोहन पटेल यांच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# वाढे भरलेल्या बैलगाडीतून पडून महिलेचा मृत्यू

**सातारा : प्रतिनिधी**

बैलगाडीतून पडून महिलेचा मृत्यू झाल्याची घटना फलटण शहर पोलीस ठाणे हद्दीत घडली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक २ फेब्रुवारी रोजी नवल तुकाराम चव्हाण राहणार कापडगाव, तालुका फलटण हा युवक कापडगाव येथे ऊस तोडणीचे काम करून बैलगाडीत वाढे भरून त्याची आई जानकीबाई तुकाराम चव्हाण यांच्याबरोबर बैलगाडीतून घरी निघाला होता. शेतातील कच्च्या रस्त्याने जात असताना एका दगडावरून बैलगाडीचे चाक गेल्याने जानकीबाई चव्हाण या वाढ्यावरून घसरून खाली डोक्यावर पडल्या. त्यांना लागलीच ॲम्बुलन्स बोलावून उपजिल्हा रुग्णालय फलटण येथे उपचारासाठी आणले असता उपचारापूर्वीच जानकीबाई चव्हाण यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले. याबाबतची फिर्याद फलटण शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.